मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 28 जानेवारी 2025 | पान- 1

# हॉटेल, रुग्णालये, शाळा महापालिकेच्या रडारवर

## करोडोची थकबाकी, तरीही कर भरण्याकडे दुर्लक्ष : महापालिकेच्या करसंकलन कार्यालयाकडून जप्तीची कारवाई सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून शहरातील लाखो रुपयांची थकबाकी असलेली मोठी हॉटेल, रुग्णालये, शाळांवर जप्तीची कारवाई सुरू आहे. शहरातील २१ शाळा, १४ खासगी रुग्णालये आणि ३५ हॉटेल यांची मालमत्ता सील करून जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील प्रसिद्ध असलेले हॉटेल, रुग्णालये, शाळा आणि शैक्षणिक संस्थांकडे अनेक वर्षांपासून मालमत्ताकराची कोट्यवधीची थकबाकी आहे. त्या मालमत्तांना महापालिकेच्या कर संकलन विभागाने जप्तीपूर्व नोटिसा बजावल्या आहेत. त्या मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

एक लाखापेक्षा अधिक थकबाकी असलेल्या बिगरनिवासी मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई तीव्र करण्यात आली आहे. नोटिसा बजावूनही प्रतिसाद न देणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यात येत आहेत. मुदतीमध्ये थकबाकी न भरल्यास त्या मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे.

शहरातील काही शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, रुग्णालय व हॉटेल्सच्या मालमत्ता सील करण्यात आल्या आहेत. संपूर्ण थकबाकी ऑनलाईन माध्यमात भरल्याशिवाय सील काढण्यात येत नाही. तसेच, धनादेश वटल्यानंतर मालमत्तेचे सील काढले जाते. ही कारवाई मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे, असे महापालिकेच्या कर संकलन विभागाचे साहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली.

### शहरातील 9 शाळा केल्या सील

» पिंपरी-चिंचवड शहरातील लाखोची थकबाकी असलेल्या शाळा आणि शैक्षणिक संस्थांच्या इमारती सील करण्याची कारवाई करण्यात येत आहेत. आतापर्यंत शहरातील ९ शैक्षणिक संस्थांना सील लावून जप्ती कारवाई केली आहे.

“ शहरातील शाळा, महाविद्यालये, औद्योगिक संस्था, हॉटेल आणि खासगी रुग्णालये यांच्या वर्षानुवर्ष लाखो रुपयांची मालमत्ता कर थकबाकी आहे. संबंधित व्यवस्थापक, जागामालकांना वारंवार नोटीस देऊनही थकबाकी भरली जात नाही. त्यामुळे यंदा संबंधितांना मालमत्ताधारकांना थेट जप्तीपूर्व नोटीस देवून थकबाकी न भरल्यास त्यांची मालमत्ता सील करण्यात येत आहे. त्यामुळे सर्वांनी तत्काळ थकबाकी भरून सहकार्य करावे.

**- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, करसंकलन विभाग, महानगरपालिका.**

---

# जवानांच्या जीवनावर आधारित नाटिकेने उपस्थितांना अश्रू अनावर!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत पिठामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत पिठामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भारतीय जवानांच्या जीवनावर आधारित नाटकेने उपस्थित त्यांना अक्षरशः अश्रू अनावर झाले.



जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज टाळगाव चिखली येथे शाळेच्या प्रांगणामध्ये भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

संचालक ह.भ.प. राजू महाराज ढोरे, संचालिका डॉ.स्वाती मुळे, प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याधपिका स्नेहल पगार, समन्वयिका मयूरी मुळूक, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, दिनेश यादव, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र यादव, चिंतन समिती सदस्य ज्ञानेश्वर तथा माऊली भांगरे, ह.भ.प युवराज शिंदे, विनायक आबा मोरे, अंकुशशेठ मळेकर उपस्थित होते.

ध्वज रोहनानंतर आर. एस.पी. च्या विद्यार्थी संचलन व स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केली. प्राचार्य डॉ ज्ञानेश्वर गाडगे यांनी शाळेने केलेल्या प्रगती व भविष्यातील वाटचालीची माहिती सांगितली. यावेळी मयुरी फडके मराठी तर कार्तिक यादव इंग्लिश, आयुष कुमार हिंदी आणि अवनी रुपनवर हिने संस्कृत भाषेतून भाषण केले, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सबसे उँची विजय पताका हे समूहगीत तर भारतीय जवानांच्या जीवनावर आधारित नाटिकेने प्रेक्षकांचे अश्रु अनावर झाले.

विद्यार्थी संचलनासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक विजय भस्मे व सुधा खोले यांनी तर समूहगीतासाठी नेहा नाफडे, अविनाश भोगील, विवेक भालेराव तर नाटिका व नृत्यासाठी सविता गोडसे, गायत्री बारी, ईशा पटोळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अभ्यासाबरोबर खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या रितिका पाटील तसेच शाळेची साफसफाई सेवा देणाऱ्या व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया पाटील व सुवर्ण भोंगाळे तर शाळेच्या समन्वयिका मयुरी मुळूक यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले, वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुण्यात 'गुलेन बॅरी सिंड्रोम'चा धोका वाढला!

## एक संशयित मृत्यू, आरोग्य यंत्रणा अलर्टवर : 7 सदस्यीय केंद्रीय उच्चस्तरीय तज्ज्ञ पथकाची नियुक्ती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी शहरात गुलेन बॅरी सिंड्रोम या मेंदूविषयक आजाराचा धोका वाढला आहे. येथे आतापर्यंत १०१ रुग्णांची नोंद झाली आहे. यापैकी ६२ रुग्ण पुणे ग्रामीण, १९ रुग्ण पुणे महापालिका, १४ रुग्ण पिंपरी चिंचवड महापालिका आणि ६ रुग्ण इतर जिल्ह्यातील आहेत. त्यामध्ये ६८ पुरुष आणि ३३ महिला आहेत.

यापैकी १६ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. रुग्णांमध्ये तीव्र लक्षणे दिसून येत असल्याने त्यांना खासगी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, गुलेन बॅरी सिंड्रोम (GBS) प्रकरणे हाताळण्यासाठी महाराष्ट्राला मदत करण्यासाठी ७ सदस्यीय केंद्रीय उच्चस्तरीय तज्ज्ञ पथकाची नियुक्ति करण्यात आल्याची माहिती



अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आज पुण्यात आरोग्य विभाग आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांसोबत गुलेन बॅरी सिंड्रोमच्या (GUILLAIN-BARRE SYNDROME) प्रादुर्भावाबाबत आढावा बैठक घेणार आहेत. ते पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी रुग्णालयांना भेटी देतील.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेने गुलेन बॅरी सिंड्रोम बाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी कमला नेहरू रुग्णालयात ४५ खाटांचा विशेष वॉर्ड तयार केला आहे.

### गुलेन बॅरी सिंड्रोम म्हणजे काय?

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माहितीनुसार, गुलेन बॅरी सिंड्रोम (GBS) ही एक दुर्मिळ आजार आहे. यामुळे व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती पेरीफेरल नसावर हल्ला करते. याची सर्व वयोगटातील लोकांना लागण होऊ शकते. पण प्रौढ व्यक्तींना याची लागण होणे हे अधिक सामान्य आहे. बहुतांश लोक या सिंड्रोमच्या सर्वात गंभीर परिस्थितीतून पूर्णपणे बरे होतात. या सिंड्रोममुळे गंभीर आजारी होण्याचे प्रमाण फार दुर्मिळ आहे. पण यामुळे संपूर्ण अर्धांगवायू आणि श्वसनाशी समस्या उद्भवू शकतात. काही परिस्थितीत गुलेन बॅरी सिंड्रोम जीवघेणाही ठरू शकतो. या आजाराने बाधित रुग्णांनी शक्य तितक्या लवकर उपचार घ्यायला हवेत. काही रुग्णांना अतिदक्षता उपचाराची गरज भासू शकते. हा सिंड्रोम स्नायूंच्या हालचाली नियंत्रित करणाऱ्या नसांवर परिणाम करु शकतो. यामुळे स्नायूची ताकद कमी होऊ अशक्तपणा जाणवू शकतो. पाय आणि हातांमध्ये संवेदना कमी होऊ शकते. तसेच गिळताना अथवा श्वास घेताना त्रास होऊ शकतो.

### एका संशयित रुग्णाचा मृत्यू

**» सोलापूर जिल्ह्यात गुलेन बॅरी सिंड्रोम बाधित एका संशयित रुग्णाचा मृत्यू झाला आहे, असे वृत्त पीटीआयने आरोग्य अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिले आहे. सदर व्यक्ती मूळचा सोलापूरचा आहे. तो पुण्यात आल्यानंतर त्याला या आजाराची लागण झाल्याचा संशय आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. महाराष्ट्रात जीबीएस संशयिताचा मृत्यू होण्याची ही पहिलीच घटना आहे.**

# महापालिकेने दिलेल्या महामानवंदनेची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद

## तब्बल 16 भाषांमध्ये भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे गायन करून इतिहास घडवला

**पुणे | प्रतिनिधी**

नेपाळसह भारतातील विविध राज्यातून आलेल्या दिडशे कलाकारांनी सांकेतिक भाषेसह तब्बल १६ भाषांमध्ये भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे गायन करून इतिहास घडवला आहे. अशा प्रकारे सांगितिक कार्यक्रमातून भारतीय संविधानाला महामानवंदना देणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या या ऐतिहासिक कार्यक्रमाची नोंद 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली आहे.

भारतीय राज्यघटनेला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाले आहेत. या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीबद्दल भारतीय राज्यघटनेला सांगितिक महामानवंदना देण्यासाठी प्रजासत्ताक दिनी महापालिकेने 'आम्ही भारताचे लोक' (हम भारत के लोग) हा दिडशे कलावंतांचा सहभाग असलेला भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर स्मारकाजवळील मैदानात हजारोंच्या उपस्थितीत विभिन्न भाषेतून भारतीय राज्यघटनेला महामानवंदना देण्यात आली. या ऐतिहासिक सोहळ्याची नोंद 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली आहे. याबाबतची घोषणा 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'च्या कार्यकारी अधिकारी प्रिती मेनन यांनी केली.

'मिले सुर मेरा तुम्हारा' या विविधतेतून एकतेचा संदेश देणाऱ्या बहुभाषिक गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. भारत हमको जान से प्यारा है, जिंदगी मौत ना बन जाए संभालो यारो, ये मेरा संविधान, अशा विविध गीतांचे गायन विविध राज्यातील बहुभाषिक कलाकारांनी केले. यानंतर भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेच्या गायनाला प्रारंभ करण्यात आला. यामध्ये हिंदी, मराठी, इंग्रजी, संस्कृत, उर्दू, पाली, कोकणी, आसामी, कन्नड, पंजाबी, गुजराती, नेपाळी, मल्याळम, भोजपुरी, बंगाली अशा १५ भाषांमध्ये भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे गायन करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महापालिका दिव्यांग भवनच्या फाऊंडेशनच्या वतीने सांकेतिक भाषेमध्येही राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे सादरीकरण करीत भारतीय राज्यघटनेला महामानवंदना दिली. प्रांतिक पोषाख परिधान करून केलेल्या या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. अशा प्रकारे सांकेतिक भाषेसह तब्बल १६ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन झालेला हा पहिला कार्यक्रम असल्याने त्याची 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली आहे. महापालिकेने राबवलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून भारतीय राज्यघटनेला अनोखी महामानवंदना देण्यात आली.

अश्वघोष कला आणि संस्कृती प्रतिष्ठान कोल्हापूरचे सुप्रसिद्ध गायक आणि संगीतकार कबीर नाईकनवरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमामध्ये लोकप्रिय पंजाबी गायिका गिन्नी माही, अंजली बौद्ध, लोकप्रिय गुजराती गायक विशान काथड, भोजपुरी गायक ओंकार प्रिन्स, मल्याळम गायक सिद्धेश, कन्नड गायक नारायणस्वामी यांच्यासह प्रशांत शिराळे (हिंदी), विजय बनगे (मराठी), सनी समुद्रे (इंग्रजी), शफिक मुल्ला (उर्दु), ममता ठाकूर देसाई (संस्कृत), मार्गेश पाटील (नेपाळी), पंडित राठोड (कोकणी), सुजीत म्हेत्री (कन्नड), सिद्धराज पाटील (गुजराती) डॉ. महेंद्र कानडे (पंजाबी), रणजित शिवशरण (पाली) अशा दिग्गज गायकांसह सुमारे १५० कलाकारांनी सहभाग घेत भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे गायन केले.

> भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. प्रजासत्ताक दिनी महापालिकेच्या वतीने सांकेतिक भाषेसह १६ विविध भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन करीत आपल्या संविधानाला विश्वविक्रमी महामानवंदना दिली. या अनोख्या अलौकिक उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. भारताचे गौरवगान करणाऱ्या या विश्वविक्रमाने शहराच्या वैभवात भर पडली असून पिंपरी चिंचवडचे नाव जागतिक पातळीवर गौरविले जात आहे. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व कलाकारांचे तसेच कार्यक्रम यशस्वीतेने घडवून आणणाऱ्या सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# गरीब मुलांना मिळणार 'सीबीएसई'चे शिक्षण, वाकडमध्ये महापालिकेची शाळा

## शाळेच्या सहामजली इमारतीचे काम अंतिम टप्प्यात असून, आगामी शैक्षणिक वर्षापासून ही शाळा सुरु होईल.

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबरच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून आता वाकड परिसरात 'सीबीएसई' शाळा सुरू करण्यात येत आहे. सध्या या सहामजली इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. आगामी शैक्षणिक वर्षापासून ही शाळा सुरू होणे अपेक्षित आहे. या शाळांमध्ये गोरगरिबांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळणार आहे. परिणामी, गेल्या अनेक वर्षांपासून 'सीबीएसई' शाळेच्या प्रतीक्षेत असणाऱ्या पालकांची प्रतीक्षा थांबणार आहे.

मागील काही वर्षांपासून पालकांचा कल इंग्रजी माध्यमातून मुलांना शिक्षण देण्याकडे आहे. मात्र, त्याचा महापालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर होत आहे. ही गळती रोखण्यासाठी महापालिकेने पीसीएमसी पब्लिक स्कूलच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू केल्या. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

परंतु असंख्य पालक दर्जेदार अशा सीबीएसई व आयसीएसई शाळांमधून मुलांना शिक्षण देण्यासाठी धडपडत आहेत. परवडत नसतानाही पालक विद्यार्थ्यांना केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश मिळवून देत आहेत. प्रशासनाने महापालिकेच्या शाळांमध्ये सीबीएसई शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

सीबीएसई शाळांची मागणी वाढत असल्यामुळे आणखी शाळा सुरू करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या शिक्षण खात्याने नियोजन सुरू केले आहे. या शाळांमुळे मुलांचे व पालकांचे सीबीएसई अभ्यासक्रमामधून शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. या स्वप्नपूर्तीसाठी किती शाळा सुरू करता येतील?, याचे नियोजन महापालिकेचा शिक्षण विभाग करत आहे.



### एकच सीबीएसई शाळा कार्यरत

» सध्या शहरात महापालिका संचलित एकच सीबीएसई शाळा सुरू आहे. २०२१ मध्ये महापालिकेने चिखली गावात 'संतपीठ' नावाने पहिली सीबीएसई शाळा सुरू केली. आता वाकड परिसरात पुढील शैक्षणिक वर्षापासून महापालिकेची सीबीएसई शाळा सुरू होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलांनाही 'सीबीएसई'चे शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

### कुठल्या सुविधा असणार ?

प्रतीक्षालय, क्रीडा कक्ष, संगीत खोली, इलेक्ट्रिक खोली, नियंत्रण कक्ष, संगीत आणि नृत्य, कला आणि हस्तकला, सामान्य विज्ञान, रंगकला (पेंटिंग), समुपदेशन, परीक्षा, भाषा प्रयोगशाळा, जैविक शास्त्र, भौतिकशास्त्र, संगणक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय आणि लिफ्टची सुविधा.

### शिक्षकांना मिळणार प्रशिक्षण

» ज्युनियर केजी, एलकेजी, युकेजी, पहिली ते सहावीपर्यंतच्या वर्गांचे नियोजन महापालिकेकडून करण्यात आले आहे. येत्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. शाळांतील शिक्षकांना संबंधित मंडळाकडून प्रशिक्षण दिले जाणार आहे. सध्या शाळेच्या इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असून काही खोल्यांमध्ये फर्निचरच्या कामास सुरूवात केल्याची माहिती एस. एस. साठे कंपनीचे वरिष्ठ अभियंता अनिल मुंढे आणि आर्किटेक्ट विनोद बोटे यांनी दिली.

> वाकड परिसरात सीबीएसई शाळा सुरू करणार आहोत. इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. पुढील सगळे नियोजन आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहोत.
>
> -संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग

> महापालिकेची सीबीएसई शाळा सुरू करण्यासाठी मी पुढाकार घेतला आहे. सीबीएसईच्या नियमावलीप्रमाणे इमारत उभारली आहे. प्रत्येक मजल्यावर सुविधा दिल्या आहेत. अडीच हजार विद्यार्थी क्षमता आहे. शेजारची जुनी शाळा येथे स्थलांतरित केली जाईल.
>
> -राहुल कलाटे, माजी नगरसेवक


# पिंपरीत साकारणार मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधीनगर, पिंपरीसमोरील महिंद्रा कंपनीच्या जागेत मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय उभारण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधीनगर, पिंपरीसमोरील महिंद्रा कंपनीच्या जागेत मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय उभारण्यात येणार आहे. त्यात 8 मजली प्रबोधिनी इमारत, 15 मजली निवासी इमारत, 22 अग्निशमन बंब बसतील अशी पार्किंग, अग्निशमन कार्यालय व कार्यशाळा, संग्रहालय व प्रेक्षागृह असणार आहे. त्यासाठी तब्बल 126 कोटी 24 लाख 30 हजार 273 रुपये खर्च करण्यात येणार आहे.

अग्निशमन विभागाचे मध्यवर्ती मुख्यालय सध्या संत तुकारामनगर येथे आहे. तेथील जागा अपुरी पडत असल्याने नव्या प्रशस्त ठिकाणी मुख्यालय बांधण्याचा नियोजन होते. गांधीनगर, पिंपरी येथील महिंद्रा कंपनीकडून 'आयटूआर' अंतर्गत मिळालेल्या 5.5 एकर जागेत हे मुख्यालय बांधण्यात येणार आहे.



त्या जागेत 8 मजली प्रबोधिनी इमारत उभारली जाणार आहे. त्या फायरमन व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तर, अग्निशमन विभागात काम करणारे फायरमन, जवान, चालक व इतर कर्मचाऱ्यासाठी 15 मजली निवासी इमारत बांधण्यात येणार आहे. त्यात 22 अग्निशमन बंब उभे करता येतील, अशी प्रशस्त पार्किंग असणार आहे. तसेच, अग्निशमन कार्यालय व कार्यशाळा असणार आहे. अग्निशमन संग्रहालय, दोनशे जणांच्या आसन क्षमतेचे प्रेक्षागृह, 50 आसन क्षमतेचे सेमिनार रूम, 100 प्रशिक्षणार्थी व 118 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असणार आहे. तसेच, कवायत करण्यासाठी मैदान असणार आहे. इतर वाहनांची दोन मजली पार्किंग व्यवस्था आहे.

या मुख्यालयास गांधीनगर झोपडपट्टीच्या बाजूने प्रवेशद्वार आहे. भविष्यात इतर बाजूने इतर मार्ग शोधण्यात येणार आहेत. मात्र, अग्निशमन बंब ये-जा करण्यास दर्शनी भागात पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे वाहतुकीचा खोळंबा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### सुसज्ज असे अग्निशमन मुख्यालय

» पिंपरी-चिंचवड शहरात लोकवस्ती वाढत आहे. शहरासाठी मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालयाची गरज होती. त्यादृष्टीने अद्ययावत असे व सर्व सुविधायुक्त मुख्यालय येथे उभारण्यात येणार आहे. मुख्यालयाद्वारे पिंपरी-चिंचवड परिसरातील अग्निशमन सेवेची कार्यक्षमता व प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा उद्देश आहे, अशी माहिती महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी दिली.

### मुख्यालय बांधण्याचा मार्ग मोकळा

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधीनगर, पिंपरी येथील महिंद्रा कंपनीच्या जागेत मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय बांधण्याचा निर्णय झाला होता. पुढे त्या ठिकाणी महापालिका भवनाशेजारी जागा असल्याने महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यात निर्णय झाला. त्यासाठी दोन्ही इमारती पादचारी मार्गाने जोडण्यात येणार होत्या. तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेचे इमारत दर्शनी भागात हवी, असे सांगितल्याने तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी तो निर्णय रद्द केला. त्यानंतर चिंचवड येथील सायन्स पार्कसमोर 18 मजली महापालिका भवन उभारण्याचा निर्णय झाला. ते काम सध्या वेगात सुरू आहे. त्यामुळे आता गांधीनगरच्या जागेत अग्निशमन मुख्यालय बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पुण्यातील 'जीबीएस' च्या रुग्णांना मिळतील मोफत उपचार

## महात्मा फुले योजनेने 'जीबीएस' साठीचे पॅकेज वाढवले; 80 हजाराहून केले 1 लाख 60 हजार

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात गुलियन बॅरी सिंड्रोम' रुग्णांची वाढती संख्या पाहता महात्मा फुले जन आरोग्य योजनेने या आजाराच्या उपचारासाठीचे असलेल्या दरांच्या मर्यादित दुपटीने वाढ केली आहे. पूर्वी ही योजना असलेल्या खासगी रुग्णालयांना योजनेकडून ८० हजार रुपये दिले जात असत.

ती आता दुप्पट करत १ लाख ६० हजार केली आहे. त्यामुळे ही योजना असलेल्या रुग्णालयांत उपचार घेणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळाला आहे. योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब चव्हाण यांनी शुक्रवारी हा निर्णय घेतला आहे.

याबाबतचे पत्र राज्य आरोग्य हमी सोसायटीने पुणे परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालकांना पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पुणे शहर, पिंपरी चिंचवडमध्ये 'जीबीएस' च्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या रुग्णांना फुप्फुसविषयक न्यूमोनिया आजार निदान होत आहे. त्यांना व्हेंटीलेटरवर उपचार घ्यावे लागत आहेत.

याबाबत पुण्याच्या विभागीय आयुक्तांनी ता. २२ रोजी घेतलेल्या बैठकीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमधील जीबीएस च्या उपचारांची रक्कम ८० हजार वाढवून १ लाख ६० हजार इतकी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सूचित केले होते. त्यानुसार हे पॅकेज वाढवले असल्याचे पत्रात म्हटले आहे.

पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) च्या आजाराच्या रूग्णांची संख्या ही सातत्याने वाढताना दिसत आहे. यावर जिल्हाधिकारी आणि काही अधिकाऱ्यांसोबत पालकमंत्री अजित पवार यांनी अगोदरच बैठक घेतलीये. हा आजार संसर्गजन्स नाही, नागरिकांनी काळजी घ्यावी असे अजित पवार हे म्हणाले आहेत. आता जीबीएस या आजारावर पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार केले जाणार आहेत. हा मोठा दिलासा म्हणावा लागेल. अगोदर फक्त खासगी रूग्णालयात उपचार हे सुरू होते.पुण्यात इलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णात वाढ पुण्यात 74 रुग्ण हे जीबीएस आहेत.

त्यापैकी 14 रुग्ण व्हेंटिलेटरवर तर पाच रुग्णांना आज डिस्चार्ज होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून जीबीएसच्या रूग्णांची संख्या वाढत असल्याने मोठी खळबळ निर्माण झाली. 50 बेड तर 15 आयसीयू कमला नेहरू रुग्णालयात आरक्षित करण्यात आले आहेत. प्रशासन या रोगाच्या विरोधात लढण्यास सज्ज झाल्याचेही बघायला मिळतंय.महापालिका आयुक्त घेणार बैठक याच पार्श्वभूमीवर पुणे महापालिका आयुक्त सर्व आरोग्य विभागाची थोडा वेळात बैठक देखील घेणार आहेत. ज्या खाजगी रुग्णालयात जीबीएसचे रुग्ण आहेत. त्या ठिकाणी महापालिकेचे मेडिकल ऑफिसर नियुक्त करण्यात येणार आहेत. नवले हॉस्पिटल, पूना हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, दीनानाथ या रुग्णालयात जीबीएसच्या रुग्णावर सध्या उपचार सुरू आहे. तिथे आता महापालिकेचे अधिकारी असणार आहेत.



### असे असतील वाढलेल्या उपचारांचे दर

उपचारांची शाखा – प्रक्रिया – खासगी रुग्णालयांना मिळणारे जास्तीत जास्त दर

- न्यूरॉलॉजी – प्लाझ्मा एक्स्चेंज व संबंधित प्रक्रिया – ८० हजारापर्यंत
- न्यूरॉलॉजी – इम्युनोग्लोब्यूलिन थेरपी, पाच दिवसांसाठी – २० हजारापर्यंत
- न्यूरॉलॉजी – पंधरा दिवसांसाठी 'जीबीएस' चे व्यवस्थापन – ६० हजारापर्यंत

### काय होईल फायदा?

- ही योजना असलेल्या रुग्णालयांत 'जीबीएस' चे उपचार घेतल्यास ते पूर्णपणे मोफत होतील. त्यासाठी रुग्णांकडून अतिरिक्त पैसे आकारता येणार नाहीत. त्यामुळे, रुग्णांचा फायदा होईल. यामध्ये कोणते रुग्णालये आहेत ही माहिती योजनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### महत्त्वाची रुग्णालये

- आदित्य बिर्ला रूग्णालय, चिंचवड
- एम्स रूग्णालय, औंध
- भारती रूग्णालय, धनकवडी
- डॉ. डी. वाय. पाटील रूग्णालय, पिंपरी
- ज्युपिटर हॉस्पिटल, बाणेर रस्ता
- श्रीमती काशीबाई नवले रूग्णालय, नऱ्हे
- सिम्बायोसिस रूग्णालय, लवळे
- ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
- वायसीएम रूग्णालय, पिंपरी
- सिद्धिविनायक रूग्णालय, बारामती मोरगाव रस्ता
- जिल्हा रूग्णालय, औंध

# शिरूर तहसील कार्यालयात कुणी कर्मचारी देता का?

## तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांची तब्बल 13 पदे रिक्त असून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांची तहसील कार्यालयातील अनेक कामे खोळांबली आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांची तब्बल 13 पदे रिक्त असून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांची तहसील कार्यालयातील अनेक कामे खोळांबली आहे. नागरिक वारंवार कामासाठी हेलपाटे मारत आहे.त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर नागरीक संतापत आहे. कामाचा मोठा भार निर्माण झाल्याने कर्मचारी तणावाखाली काम करत आहे.

विशेष म्हणजे या कार्यालयात मूळ नियुक्ती असलेल्या तीन जणांची सेवा वरीष्ठांनी एवढी पदे रीक्त असताना स्थलांतरित केली असून मूळ नियुक्तीच्या ठिकाणी ते काम करत नाही. त्यामुळे शिरूर तालुक्यावर मोठा अन्याय होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. आता याकडे नवनिर्वाचित आमदार माऊली कटके यांनी लक्ष घालण्याची नागरीकांकडून मागणी होत आहे.

शिरूर तालुक्यातील नागरीकांच्या 155 च्या, रस्ता, जमिनीच्या वेगवेगळी खटले कर्मचारी कमी असल्याने गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असल्याची माहिती नागरिकांनी दिली. नागरीकांच्या रखडलेल्या कामासाठी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी कंबर कसली असून कामे



### त्यांचे वेतन मात्र शिरूर तहसीलमधूनच

- शिरूर तहसीलमधीलरिक्त जागांबाबत वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार सुरू आहे. शुक्रवारी (दि. 24) रिक्त जागांबाबत धक्कादायक बाब समोर आली आहे. येथील मूळ नियुक्ती असलेले काही अव्वल कारकून, महसूल सहाय्यकांची मात्र सेवास्थानंतरने पुणे व खेड येथे नियुक्ती करण्यात आली आहे यांचे वेतन मात्र शिरूर तहसीलमधूनच देण्यात येत आहे..

> काही कर्मचाऱ्यांवर सेवास्थानांतराची मेहेरबानी नक्की कशासाठी केली जात आहे? वरिष्ठ कार्यालयाकडून हा मात्र संशोधनाचा विषय झाला आहे, पुढील आठ दिवसांच्या आत वरिष्ठ कार्यालयाने जनहित लक्षात घेऊन ही बाबत गांभीर्याने योग्य कार्यवाही न केल्यास आंदोलन करणे भाग पडेल.
>
> -निलेश वाळुंज, सामाजिक कार्यकर्ते